MHAK060012672024

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | २०/०५/२०२४ | | |
| नोंदणी तारीख | : | २०/०५/२०२४ | | |
| निकाल तारीख | : | ०६/०३/२०२६ | | |
| कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | ०१ | ०९ | १४ |

**भाग 'अ'**
**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पृष्ठ)**
**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **...निशाणी क्र. २०...** |
| **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग [न्यायालय क्र.२] अकोट यांच्या न्यायालयात** (पिठासीन अधिकारी,श्री. ए. ए. माळी) | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **४१/२०२४** **अकोट ग्रामिण,** पोलीस ठाणे जि. अकोला. |
| न्यायनिर्णयाची तारीख | **०६/०३/२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **नि. फौजदारी खटला क्र. ९६/२०२४** |
| | CNR.No. **MHAK060012672024** |
| तक्रारकर्ता/ अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासनतर्फे,** मार्फत/द्वारा पोलीस ठाणे अंमलदार, पोलीस स्टेशन अकोट ग्रामिण, जि. अकोला. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. ए. ओ गाडेकर,** (सरकार पक्षातर्फे विधीज्ञ) |
| आरोपी | **१) शितल नितीन कोकाटे,** वय– ३४ वर्षे, व्यवसाय– मजुरी **२) नितीन उत्तमराव कोकाटे,** वय– ३८ वर्षे, व्यवसाय– मजुरी दोन्ही आरोपी रा. ग्राम रूईखेड, ता. अकोट, जि.अकोला. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **ॲड. श्री. डी. डी. वर्मा** (बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग 'ब'**
**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०८/०२/२०२४ |

| | |
|---|---|
| पहिल्या खबरीची तारीख | ०८/०२/२०२४ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २०/०५/२०२४ |
| दोषारोपनिश्चतीची तारीख | १५/१०/२०२५ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ०४/१२/२०२५ |
| न्यायनिर्णयाची नेमलेली तारीख | ०६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६/०३/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | लागु नाही |

## आरोपीबाबत तपशील

| आ क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२. | **शितल नितीन कोकाटे**<br>**नितीन उत्तमराव कोकाटे** | समजपत्रावर सोडले | १५.१०.२०२५ | भारतीय दंड विधान १८६० च्या कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ नुसार. | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. | -- | -- |

| **या न्यानिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | फौ.प्र.सं, १९७३ |
| भारतीय दंड विधान, १८६० | भा.दं.वि, १८६० |
| भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ | भा. पु. अ, १८७२ |

## न्यायनिर्णय

## (दिनांक : ०६/०३/२०२६ रोजी खुल्या न्यायदालनात घोषीत)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम (संक्षिप्तरित्या "भा.दं.वि.") ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोप असल्याने संपरिक्षीत करण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे की, आरोपी क्र. १ ही फिर्यादी हरिशचंद्र गोपाळराव कोकाटे याची पुतण सुन असुन आरोपी क्र. २

पुतण्या आहे. फिर्यादी व त्याचे कुटूंबिय त्याच्या राहत्या घरी शौचालय नसल्यामुळे फिर्यादी व त्याचे कुटूंबिय त्याच्या पत्नीच्या नावावर असलेल्या घरामधील शौचालयात शौचास जातात. दि. ०८/०२/२०२४ रोजी सकाळी ०७:०० वाजता फिर्यादी हा सदर घरातुन शौच करून परत येत असतांना आरोपी हे फिर्यादीजवळ आले व तुम्ही इकडे संडासला का आले असे म्हणाले. फिर्यादीने हे घर माझ्या पत्नीच्या नावाने आहे, मी केव्हाही या घरात येईल असे सांगितल्याचा आरोपींना राग आला व आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ केली. आरोपी क्र. १ ने हातात दगड उचलुन फिर्यादीच्या कपाळावर मारला व फिर्यादीला रक्ताची दुखापत केली. सबब, फिर्यादी याने अकोट ग्रामिण पोलीस ठाणे येथे समक्ष हजर होवून घटनेची माहिती दिली.

३. सदर माहितीच्या आधारे ठाणे अंमलदार दहिहांडा पोलीस ठाणे याने आरोपींविरूध्द भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ३२५, ५०४ सह कलम ३४ अन्वये अपराधांसाठी गुन्हा क्र. ४१/२०२४ नोंदवला. तपासाचे काम पो.हे.कॉ अजय माहोरे, ब. नं. १९९८ याचेकडे सोपविण्यात आले. तपास अधिकारी याने तपासादरम्यान घटनास्थळ व जप्ती पंचनामे तयार केले, साक्षीदारांचे जबाब नोंदविले. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र तसेच आवश्यक कागदपत्रे गोळा केलीत व तपासाअंती आरोपींनी वरप्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपींविरुध्द प्रस्तुत दोषारोपपत्र दाखल केले.

४. मी संचिकेचे अवलोकन करून आरोपींविरुध्द नि.क्र.१० नुसार भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वये अपराधांसाठी दोषारोपाची मांडणी केली. सदर दोषारोपातील मजकुर आरोपींना मातृभाषेतुन वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपींनी त्यांच्यावर लावलेले आरोप नाकारून खटला चालवण्याची विनंती केली. अभिलेखावर आरोपींविरूध्द कोणत्याही विपरीत पुराव्यांची नोंद न झाल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपींची निवेदने वगळण्यात आलीत.

५. प्रस्तुत खटला न्यायनिर्णयीत करण्यासाठी खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थितीत होत असुन त्यावरील माझे निष्कर्ष सुसंगत कारणमिमांसेसह मी पुढीलप्रमाणे स्पष्ट करीत आहे ;

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | आरोपींनी संगनमताने फिर्यादी हरिशचंद्र गोपाळराव कोकाटे यास दगडाच्या सहाय्याने मारून इच्छापुर्वक दुखापत केली व त्यान्वये आरोपींनी भा.दं.वि कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| २) | आरोपींनी संगनमताने फिर्यादी हरिशचंद्र गोपाळराव कोकाटे यास उद्देशपुर्वक शिवीगाळ करुन प्रक्षोभीत केले व अशा प्रक्षोभनामुळे त्याचेकडुन सार्वजनिक ठिकाणची शांतता भंग होईल किंवा एखादा गुन्हा घडेल याची आरोपींना जाणिव होती व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला असे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ३) | काय आदेश ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## – <u>का र ण मि मां सा</u> –

६. अभियोगपक्षाने आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी न्यायनिर्णयाचे परिशिष्ट 'क' यात नमुद साक्षीदारांची साक्ष नोंदवुन त्यावर भिस्त ठेवली आहे.

***<u>मुद्दा क्र.१ व २ करीता</u>–***

७. प्रस्तुत सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे न्यायनिर्णयाची अतिविस्तृतता टाळण्यासाठी मी ते एकत्रितपणे चर्चेसाठी घेत आहे. अभियोग

पक्षाच्या खटल्यानुसार आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी हरिशचंद्र गोपाळराव कोकाटे यास कपाळावर दगड मारून इच्छापुर्वक दुखापत केली तसेच त्यास उद्देशपुर्वक शिवीगाळ केली असा आरोपींवर दोषारोप आहे.

८. या अनुषंगाने फिर्यादी तथा एकमेव जखमी साक्षीदार हरिशचंद्र (अ.सा.क्र.२) याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्याने दोन्ही आरोपींना ओळखले. आरोपींसोबत केवळ बोलाचाल झाली होती व त्याव्यतिरीक्त अन्य काहीही घडले नाही असा फिर्यादीने शपथेवर तोंडी पुरावा दिलेला आहे. फिर्यादीने फिर्याद व प्रथम खबर अहवालावरील आपल्या सह्या ओळखल्या परंतु त्यातील मजकुर मात्र स्पष्टपणे नाकारला आहे. सबब, अभियोग पक्षाकडुन फिर्याद व प्रथम खबर अहवाल संशयापलिकडे शाबित झालेला नाही.

९. प्राप्त परिस्थितीत सदर महत्त्वपूर्ण फिर्यादी तथा जखमी साक्षीदार याने त्याची फिर्याद व पुर्वीच्या जबाबांशी विसंगत कथने केल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार फिर्यादीला न्यायालयाच्या परवानगीने सुचक प्रश्न विचारले. परंतु, आरोपींना गुन्ह्यात गोवण्याइतपत कोणत्याही उपयुक्त अशा मान्य कथनाची अथवा विपरीत पुराव्याची नोंद अभिलेखावर त्यांच्या तोंडी पुराव्यातुन झालेली नाही. याउलट सदर फिर्यादी तथा जखमी साक्षीदाराने सुचक प्रश्नांदरम्यान आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपली तडजोड झाल्याची बाब मान्य केली आहे.

१०. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला पंच साक्षीदार रमेश (अ.सा.क्र.१) याने देखील त्याच्या समक्ष कोणताही घटनास्थळ अथवा जप्ती पंचनामा झाला नाही असे कथन करून घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावेळची आपली उपस्थिती नाकारली. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार सदर पंच साक्षीदाराला देखील न्यायालयाच्या परवानगीने सुचक प्रश्न विचारले. परंतु, घटनास्थळ व जप्ती शाबित होईल अशा

कोणत्याही विपरीत पुराव्याची नोंद अभिलेखावर सदर साक्षीदाराच्या तोंडी पुराव्यातुन झालेली नाही. सबब, घटनास्थळ व जप्ती पंचनामा देखील संशयापलिकडे शाबित झालेला नाही.

११. आरोपींनी अभिलेखावर उपलब्ध वैद्यकिय तसेच जप्ती व घटनास्थळाबाबतचा कागदोपत्री पुरावा मान्य केला आहे. सबब, उपलब्ध पुरावा पाहता अभियोग पक्षाचे इतर साक्षीदार तपासण्यात काहीच तथ्य उरत नाही. परिणामी अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. याठिकाणी नमुद करणे गरजेचे आहे की, फिर्यादीच्या प्रत्यक्ष पुराव्याचे एकत्रितपणे अवलोकन केले असता आरोपींवरील दोषारोपच मुळात संशयापलीकडे शाबित करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. त्यामुळे जरी आरोपींनी वैद्यकिय तसेच जप्ती व घटनास्थळाबाबतचा कागदोपत्री पुरावा मान्य केलेला असला तरी त्यामुळे आरोपींवरील दोषारोप शाबित झाला असे म्हणता येत नाही. सबब, आरोपींवरील दोषारोप संशयापलिकडे शाबित झालेला नाही. म्हणुन मी मुद्दा क्र. १ व २ साठी नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

***<u>मुद्दा क्र.३ करीता</u>***–

१२. मुद्दा क्र. १ व २ वरील नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपींवरील दोषारोप संशयापलीकडे शाबित न झाल्याने आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. प्रस्तुत प्रकरणी जप्त एक दगड हा मुद्देमाल न्यायालयात जमा करण्यात आलेला आहे. सदर मुद्देमाल मुल्यहिन असल्याने आव्हान कालावधीनंतर तो नाश करणे योग्य होणार आहे. दोन्ही आरोपी जामीनावर मुक्त आहेत. सबब, मुद्दा क्र. ३ साठी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

1. दोन्ही आरोपींची भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ व ५०४ अन्वये दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे वैयक्तिक जातमुचलके व जामिन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ नुसार प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चा वैयक्तिक जातमुचलका व तितक्याच रकमेचे जामिन बंधपत्रे सादर करावीत.

४. प्रस्तुत प्रकरणी जप्त एक दगड हा मुद्देमाल मुल्यहिन असल्याने आव्हान कालावधीनंतर नाश करावा.

(*न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात अधिघोषीत केला*).

**स्वा/–**

अकोट.
(ए. ए. माळी)

दिनांक : ०६/०३/२०२६.
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(न्या.क्र.२) अकोट, जि. अकोला.

**भाग 'क'**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष**

| क्रमांक | नांव | पुराव्या प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | रमेश महादेव वाकोडे (नि.क्र.१३) | घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार |
| सा.क्र.२ | हरिशचंद्र गोपाळराव कोकाटे (नि.क्र.१६) | फिर्यादी तथा जखमी साक्षीदार |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी**

**ब. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १७ | फिर्यादी तथा जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| २. | १८ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | १९ | जप्ती पंचनामा |

**क. महत्त्वाच्या वस्तु**

| अ.क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| .. | निरंक | निरंक |

**RCC No. 96/2024**
**Judgment/Exh. 20**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file Judgment are same word to word as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. N. DURATKAR |
| Court Name | : | 2nd Joint Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Akot, Dist. Akola |
| Date of decision | : | 06/03/2026. |
| Judgment Signed by P.O on | : | 09/03/2026. |
| Judgment Uploaded on | : | 09/03/2026. |